# सरकार विरुद्ध रिझर्व बँक

*सरकारनं कलम सात लागू केलं, यातून नव-उदारमतवादी गोटात राजकीय कर्तेपणावरून फूट पडल्याचे संकेत मिळतात.*

भारतीय रिझर्व बँक आणि केंद्र सरकार यांच्यात कामकाजविषयक स्वायत्ततेवरून रस्सीखेच होण्याचे प्रकार नवीन नाहीत. परंतु, रिझर्व बँक व विद्यमान राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकार यांच्यातील वादानं अभूतपूर्व पातळी गाठली आहे. रोकडसुलभता, बँकेतर वित्तीय संस्थांना कर्जपुरवठा, अकरा दुर्बल सरकारी बँकांपैकी तिघींवरील तत्काळ दुरुस्ती कारवाईला सौम्य करणं, इथपासून ते राखलेला साठा व पुढील अतिरिक्त रक्कम सरकारकडे हस्तांतरित करणं यासंबंधीच्या हिशेबाचं सूत्र- अशा विविध मुद्द्यांवर रिझर्व बँकेची मतं मागवताना केंद्र सरकारनं 'भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४' मधील कलम ७ वापरल्याचं म्हटलं जातं आहे. अर्थ मंत्रालयानं प्रसिद्ध केलेल्या पत्रकात कलम सातचा उल्लेख नाही, परंतु या मुद्द्यांवरील सरकारची भूमिका बँकेच्या स्वायत्ततेला बाधा आणणारी आहे व बँकेच्या गव्हर्नरांची अधिसत्ता क्षीण करणारी आहे, अशी आरडाओरड रिझर्व बँकेमध्ये सुरू आहे.

कलम सातसंबंधीचा हा उपद्व्याप कशाकरिता सुरू आहे? सार्वजनिक हिताच्या प्रश्नांवर रिझर्व बँकेला वेळोवेळी आदेश देण्याचे अधिकार या कलमानं केंद्र सरकारला दिले आहेत. अर्थात, आदेशापूर्वी बँकेच्या गव्हर्नरांशी सल्लामसलत करणं आवश्यक आहे. बँकिंग संस्थांच्या आधीच तणावग्रस्त झालेल्या कार्यक्षमतेबद्दलची चिंता वाढत असताना या कलमावरून वाद उद्भवला आहे. यासंबंधी चिंता रास्तच आहे, कारण सरकारी बँकांच्या मालमत्ताविषयक धोरणात्मक भूमिकेवर राज्यसंस्थेनं अतिक्रमण केल्यामुळं या क्षेत्रात संकटस्थिती निर्माण झाली. पायाभूत सुविधांना वित्तपुरवठा करण्याच्या नावाखाली अनिर्बंधपणे कर्ज देण्यासाठी सरकारनं या बँकांना उत्तेजन दिलं, दुसरीकडे मोठ्या उद्योगांना व कंपन्यांना दिलेली कर्जं बुडाली (सरकारी बँकांच्या तीन चतुर्थांश निष्क्रिय संपत्तीमध्ये अशा बुडित कर्जांचा वाटा आहे). पण हे सगळं करताना राज्यसंस्थेला कधी कलम सातची गरज भासली नव्हती. एक समभागधारक म्हणून असलेले अधिकार वापरून सरकारला बँकांमधील वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या राजकीय नियुक्त्यांवर प्रभाव टाकता येतो. प्रस्थापित सरकारशी जुळवून घेत रिझर्व बँकेच्या नियामक चौकटीला मोडण्याची क्षमता असलेले पदाधिकारी निवडणं त्यामुळंच शक्य होतं. आता, २०१९ सालच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सरकारी पैशाचं प्रचंड गैरव्यवस्थापन झाल्याबद्दल मोठी टीका होते आहे, त्यासंबंधी स्वतःचा कसाबसा बचाव करायचा सरकारचा प्रयत्न सुरू आहे. कलम सातचा वापर हा विविध कारणांमुळं सरकारसाठी अब्रू वाचवणारा ठरू शकतो. रिझर्व बँकेवरील दोषारोप बळकट केले की सरकारला स्वतःची प्रतिमा स्वच्छ असल्याचा भास निर्माण करता येईल. शिवाय, आपल्या राजकीय ग्राहकवर्गाला सोईचं ठरेल अशा रीतीनं बँकेच्या नियामक धोरणांना पातळ करण्यासाठी बँकेवर राजकीय दबावही निर्माण करता येईल. अशा दबावाचा वापर करून बँकेचा (अंतर्गत) साठा आणि सरकारकडे होणाऱ्या अतिरिक्तता हस्तांतरणापेक्षा अधिकचा पैसाही लाटता येईल, त्यातून आपल्या लोकानुनयी बडबडीला पाठबळ पुरवता येईल, असा कयास सरकारनं बांधला असावा.

मुळात भारतीय रिझर्व बँकेची स्वायत्तता केवळ नाममात्र आहे, हे वेळोवेळी सिद्ध झालेलं असतानाही अचानक बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी इतकी भयग्रस्त प्रतिक्रिया का दिली? निःश्चलनीकरणाचा वापरून गुळगुळीत झालेला दाखला इथं पुन्हा तपशिलात नोंदवायला नकोच. सरकारच्या दबावाला बळी पडून बँकेनं २०१४ ते २०१६ या आर्थिक वर्षांमधील आपलं जवळपास सर्व उत्पन्न 'अतिरिक्त' म्हणून सरकारकडं हस्तांतरित केलं, त्यामुळं या काळात स्वतःच्या आकस्मिक निधीमध्ये आणि संपत्ती विकास निधीमध्ये हस्तांतरित करण्यासाठी बँकेकडं काहीच उरलं नाही. त्यानंतर २०१८ साली संपलेल्या आर्थिक वर्षातही बँकेंनं 'सुरचित अतिरिक्तता वाटप धोरण' अंमलात आणलं. (बाजारपेठीय शक्तींच्या चंचलतेमुळं) आर्थिक भांडवल पातळ्यांमध्ये निर्माण झालेली चक्राकारता शमवण्यासाठी हे धोरण राबवल्याचं सांगण्यात आलं, आणि २०१७या आर्थिक वर्षापेक्षा अतिरिक्तता हस्तांतरणामध्ये ६३ टक्क्यांनी वाढ झाली. असे इतरही काही प्रसंग आहेत. शिवाय, बँकिंग क्षेत्रातील विद्यमान संकट हळूहळू साचत गेलेलं आहे, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. या पार्श्वभूमीवर महत्त्वाची बँकिंग धोरणं व त्याचे परिणाम या संदर्भात रिझर्व बँकेचे पदाधिकारी व त्या-त्या वेळचे सत्ताधारी यांच्यात संगनमत नसतं, हे मान्य करणं अवघड आहे. किंबहुना, रिझर्व बँकेची सर्वोच्च प्रशासकीय सूत्रं हाती असणाऱ्या केंद्रीय संचालक मंडळावरील सदस्यांची नियुक्ती 'भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४'च्या कलम ८(४) अंतर्गत होते आणि तिचं स्वरूप राजकीयच असतं. यामध्ये बँकेचे गव्हर्नर व उप-गव्हर्नर यांचाही समावेश असतो. या दोघांचाही कार्यकाळ, पदच्युती व पुनर्नियुक्ती हे सगळं केंद्र सरकारच्या अधिकारात ठरतं.

केंद्रीय बँकेच्या शासनविषयक यंत्रणेभोवती सुरू असलेलं राजकारण म्हणजे बँकेला आर्थिक कार्यक्षमतेपेक्षा राजकीय लोकानुनयाच्या वैधतेनुसार कामकाज चालवण्यासाठी भाग पाडण्याचा प्रकार आहे. यातून 'सर्वंकष' स्वायत्तता आणखीच भ्रामक ठरेल. नव-उदारमतवादामध्ये बँकिंग व्यवस्था या सरकारांच्या आणि राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या खाजगी घटकांच्या छुप्या भागीदार असतात. राजकीय पक्षांना मोठ्या प्रमाणात देणग्या देऊन बडे उद्योग व कंपन्या स्वतःचं राजकीय मूल्यं वाढवतात, मग याच उद्योग व कंपन्यांनी बँकांची कर्जं बुडवली तरीही चालून जातं. परंतु, बँकिंग क्षेत्र अपयशी ठरल्यास त्यासंबंधीच्या तोट्याचं वाटप करण्यासाठी सरकारला ठेवीदारांचा राजकीय पाठिंबाही गरजेचा असतो, आणि हेच ठेवीदार मुख्यत्वे मतपेढीचे घटक असतात. अशा वेळी आपला हेतू स्वच्छ असल्याचं मतदारांना वाटावं, यासाठी सरकार कायदानिर्मितीचा मार्ग चोखाळतं. त्याचप्रमाणे, अशा कायद्यांच्या अंमलबजावणीचे नियम लाभदात्यांच्या हितसंबंधांना सोयीस्कर ठरतील अशा रितीनं बदलले जातात. अशा परिस्थितीत स्वतंत्र नियामक/केंद्रीय बँक यांना केवळ राज्यसंस्थेच्या राजकीय कर्तेपणाचं समर्थन करण्यापुरतं वैधानिक स्थान मिळतं.

परंतु, जागतिक वित्तीय बाजारपेठेच्या बदलत्या नियामक अवकाशात, भारतीय रिझर्व बँकेलाही स्वतःची पर्यवेक्षकाची प्रतिमा पुन्हा स्थापित करण्यासाठीची सक्ती होते आहे. घटता नफा, दुर्बल उत्पन्न आणि गुंतवणूकदारांचा कमी झालेला रस असे अनेक प्रश्न बँकेसमोर आहेत. त्याचसोबत, ताळेबंद सुधारण्यासाठी व वित्तपुरवठ्यामध्ये लवचिकता आणण्यासाठी आवश्यक धोरणं सरकारच्या निवडणुकीय डावपेचांना छेद देणारी ठरू शकतात. अर्थ मंत्रालय आणि रिझर्व बँकेचे अधिकृत संचालक यांच्यातील चिखलफेकीमध्ये अशा पक्षपाती हितसंबंधांचा संघर्ष स्पष्टपणे दिसून येतो. यात अर्थ मंत्री अरुण जेटली यांनी 'सार्वजनिक हिता'च्या भूमिकेचा पुरस्कार चालवला आहे, तर रिझर्व बँकेचे उप-गव्हर्नर विराल आचार्य यांनी बँकेच्या कामकाजाला 'वित्तीय बाजारपेठांचा क्रोध' सहन करावा लागत असल्याची भूमिका मांडली आहे. स्वतःचं कुरण शाबूत ठेवण्यासाठी रिझर्व बँकेची खरडपट्टी

काढण्यासाठी सरकार पुढं येत असताना बँकिंग क्षेत्रातील कर्तव्यच्युतीपासून स्वतःला मोकळं करण्याकरिता रिझर्व बँकेचे पदाधिकारी 'स्वायत्तते'चा मुद्दा लावून धरत आहेत. ●

## काश्मीरमधील आक्रसता निवडणुकीय अवकाश

*जम्मू-काश्मीरमध्ये अलीकडंच झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुख्यप्रवाही राजकीय पक्षांसाठी सुचिन्ह दाखवणाऱ्या नाहीत.*

जम्मू-काश्मीरमध्ये अलीकडंच झालेल्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांनी काश्मीर खोऱ्यातील आक्रसणारा लोकशाही अवकाश स्पष्टपणे उघड्यावर आणला आहे. २००२ सालच्या विधानसभा निवडणुकीपासून तिथं निर्माण झालेला चैतन्यशील निवडणुकीय अवकाश गेल्या काही वर्षांमध्ये ओसरल्याचं दिसतं.

राज्यातील ७९ नगरपालिका संस्था (यात श्रीनगर व जम्मूमधील ७१ महानगरपालिका आहेत) सहा नगर परिषदा, आणि ७१ नगरपालिका समित्या यांसाठी झालेल्या निवडणुकांमध्ये ३५ टक्के मतदान झालं. मुख्यत्वे जम्मू व लडाख प्रांतांमधील मतदानाच्या मोठ्या टक्केवारीमुळं हे सरासरी प्रमाण दिसून आलं. परंतु, काश्मीर खोऱ्यात निवडणुकांकडं जवळपास पूर्णतः पाठ फिरवण्यात आली. या भागात सर्वाधिक मतदानाचं प्रमाण ८.३ टक्के इतकं होतं, आणि तेही पहिल्या फेरीत नोंदवलं गेलं. नंतरच्या फेऱ्यांमध्ये मतदानाची टक्केवारी आणखी कमी झाली- दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या फेऱ्यांमध्ये अनुक्रमे ३.४ टक्के, ३.४९ टक्के आणि ४ टक्के असं मतदान झालं. मतदानाचा दिवस उजाडण्याच्या बऱ्याच आधीपासूनच लोकांनी निवडणुकीय प्रक्रियेकडं पाठ फिरवल्याचं स्पष्ट झालं होतं. नामांकन अर्ज भरण्यासाठी उमेदवार तत्परतेनं पुढं येत नव्हते, आणि अनेक विभागांमध्ये एकतर कोणीच उमेदवार नव्हता किंवा केवळ एकच उमेदवार उभा होता. त्यामुळं, काश्मीरमधील एकूण ५९८ विभागांपैकी केवळ १८६ विभागांमध्येच मतदान झालं. तर, २३१ विभागांमध्ये नामांकन दाखल केलेले एकेकटे उमेदवारच स्पर्धेविना पुन्हा निवडून आले. याशिवाय, १८१ विभागांमध्ये कोणीच उमेदवार उभे नव्हते. अखेरीस, जवळपास ४१२ विभागांमध्ये अजिबातच मतदान झालं नाही. फुटीरतावादी आणि सशस्त्र संघटनांनी मतदानावर बहिष्कार टाकण्याचं आवाहन केलं होतं, या पार्श्वभूमीवर परिस्थिती इतकी बिघडली होती की, मतदान झालेल्या मतदारसंघांमध्येही प्रचारमोहिमा झाल्या नव्हत्या, काही ठिकाणी सुरक्षेच्या कारणास्तव उमेदवारांची नावं गोपनीय ठेवण्यात आली होती त्यामुळं लोकांना आपल्या मतदारसंघात कोणते उमेदवार उभे आहेत हे माहितीही नव्हतं.

काश्मीरमध्ये १९८९नंतरच्या कालखंडात सुरू झालेल्या सशस्त्र बंडखोरीचा सुरुवातीचा टप्पा आठवावा अशी आत्ताच्या निवडणुकीदरम्यानची परिस्थिती होती. बंडखोरी तीव्र स्वरूपात होती त्या काळात मुख्यप्रवाही राजकारण पूर्णतः कोलमडलं होतं आणि निवडणुकीच्या राजकारणाला कोणतीही वैधता उरली नव्हती. उदाहरणार्थ, १९८९ सालच्या संसदीय निवडणुकांमध्ये राज्यात केवळ ५ टक्के मतदान झालं. त्या निवडणुका थट्टेचा विषय ठरल्या होत्या. १९९६ सालच्या विधानसभा निवडणुकांमध्ये चांगल्यापैकी मतदान झालं. पण सुरक्षा दलं आणि पक्ष बदललेल्या बंडखोरांच्या उपस्थितीमुळं त्या वेळचा मतदारांचा सहभाग 'सक्ती'चा होता, असं बोललं गेलं; त्यामुळं निवडणुकीच्या वैधतेत उणेपणा आला. २००१ सालच्या पंचायत निवडणुकाही वादग्रस्त ठरल्या- या वेळी अनेक मतदारसंघांमध्येही एकाही उमेदवारानं नामांकन अर्ज भरला नव्हता.

परंतु, २००२ सालच्या विधानसभा निवडणुकांपासून

विश्वसनीय निवडणुकीय प्रक्रिया वाढीला लागली. फुटीरतावाद्यांचा अवकाश कायम राहिला, परंतु नॅशनल कॉन्फरन्स आणि पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टी (पीडीपी) या दोन काश्मीरस्थित राजकीय पक्षांमधील तीव्र स्पर्धेद्वारे निवडणुकीय राजकारणातील हितसंबंध वाढले आणि लोकांचा सहभागही वाढला. त्यानंतरच्या प्रत्येक निवडणुकीत मतदानाचं वाढतं प्रमाण पाहायला मिळालं. अर्थात, त्यामध्येही काही विशिष्ट आकृतिबंध दिसत होताच. एखादी निवडणूक जितक्या स्थानिक पातळीवरची असेल तितकं मतदानाचं प्रमाण अधिक असायचं. त्यामुळं संसदीय निवडणुकांच्या तुलनेत विधानसभा निवडणुकांच्या वेळी अधिक उत्साह दिसायचा. विधानसभा निवडणुकांपेक्षा पंचायतीच्या निवडणुकांमध्ये काश्मिरी लोक अधिक जोमानं सहभागी होत. २०११ सालच्या पंचायतीच्या निवडणुकांमध्ये जवळपास ८० टक्के मतदान झालं. या सर्व कालखंडात फुटीरतावाद्यांनी आणि बंडखोरांनी निवडणुकांवरील बहिष्कारासाठी केलेली सर्व आवाहनं दुर्लक्षिण्यात आली. विशेष म्हणजे २००८ साली अमरनाथ जमिनीसंबंधीच्या वादानंतर प्रचंड फुटीरतावादी लाट आली असूनही, त्यानंतर महिन्याभरात झालेल्या २००८च्या विधानसभा निवडणुकांमध्ये ५२ टक्के मतदान झालं (चार जिल्ह्यांमध्ये तर ६० टक्क्यांहून अधिक मतदान झालं). त्याचप्रमाणे, २०१० साली पाच महिने फुटीरतावादाची लाट उसळली होती, पण २०११ सालच्या पंचायतीच्या निवडणुकांमध्ये नागरिक उत्साहानं सहभागी झाले. निवडणुकीय अवकाशातील हा जिवंतपणा २०१४ सालच्या विधानसभा निवडणुकांमध्येही दिसून आला. या निवडणुकांपूर्वी जोरकस प्रचारमोहिमा झाल्या आणि पक्षांमध्ये तीव्र स्पर्धाही दिसून आली. काश्मीरमधील ४६ मतदारसंघांपैकी २३ ठिकाणी ६० टक्क्यांहून अधिक मतदान झालं, १३ मतदारसंघांमध्ये ७० टक्क्यांहून अधिक मतदान झालं, तर पाच मतदारसंघांमध्ये ८० टक्क्यांहून मतदारांनी आपला कौल दिला.

निवडणुकीय जोमदारपणाच्या या सर्व काळात काश्मिरी नागरिकांनी 'शासनासाठी राजकारण' (मुख्यप्रवाही राजकारण) आणि 'संघर्षनिवारणासाठी राजकारण' (फुटीरतावादी राजकारण) यांमध्ये स्पष्ट भेद केला होता. त्यामुळं, फुटीरतावादी राजकारण टिकून राहिलं, तरी लोकशाही अवकाशही सक्रिय होता. लोकांनीही फुटीरतावादी भावना कायम ठेवतच वीज, रस्ते व पाणी यांसारख्या दैनंदिन मुद्द्यांसाठी निवडणुकीय राजकारणाची गरज मान्य केली. म्हणूनच, फुटीरतावादी राजकारणाच्या लाटा उफाळल्या, तरीही काश्मीरमध्ये निवडणुकीय राजकारणाची व शासनविषयक राजकारणाची वैधता टिकून राहिली.

'शासनासाठी राजकारण' आणि 'संघर्षनिवारणासाठी राजकारण' यांचा समांतर प्रवास सुरू ठेवणारा टप्पा आता संपुष्टात आल्यासारखा दिसतो आहे. २०१४ साली शेवटच्या यशस्वी निवडणुका झाल्या, तेव्हापासून– विशेषतः २०१६ सालच्या फुटीरतावादी लाटेनंतर– काश्मीरमधील परिस्थितीत बराच बदल झाला आहे. श्रीनगर संसदीय मतदारसंघासाठी २०१७ साली झालेल्या पोटनिवडणुकीमध्ये या बदलाचं स्पष्ट प्रतिबिंब पडलं. तीव्र हिंसाचार आणि निदर्शनांनी अडथळा आणलेल्या या निवडणुकीवेळी केवळ ८ टक्के मतदान झालं.

नॅशनल कॉन्फरन्स व पीडीपी या दोन्ही पक्षांनी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर बहिष्कार टाकला, यावरून मुख्यप्रवाही पक्षांना काश्मीरमध्ये किती तीव्र आव्हानांना सामोरं जावं लागतं आहे, याचा अंदाज यावा. वरवर पाहता, सर्वोच्च न्यायालयात आव्हान मिळालेल्या 'अनुच्छेद ३५-ए' संदर्भातील राजकीय अस्थिरतेमुळं हे पक्ष निवडणुकीय प्रक्रियेपासून दूर राहिले आहेत. परंतु, खरं कारण काश्मीरमधील प्रत्यक्ष परिस्थितीमध्ये दडलेलं आहे– ही परिस्थिती मुख्यप्रवाही राजकारणासाठी पूरक राहिलेली नाही.

●

हा लेख रेखा चौधरी (rekchowdhary@gmail.com) यांनी लिहिला आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्स्ड

स्टडीज्, राष्ट्रपती निवास, सिमला, इथं त्या फेलो म्हणून कार्यरत असून 'जम्मू अँड काश्मीर: पॉलिटिक्स ऑफ आयडेन्टिटी अँड सेपरेशन' (२०१६) हे पुस्तक त्यांनी लिहिलं आहे.

---

## साबरीमाला निकाल आणि त्याचे विरोधक

*लिंगभावात्मक न्यायाचं मूल्य आत्मसात करण्यात अपयशी ठरलेला समाज स्वाभिमानामध्येही कमी पडत असतो.*

साबरीमाला मंदिरामध्ये महिलांना प्रवेश देण्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयानं अलीकडेच दिलेल्या निकालाचे समर्थक आहेत, तसेच विरोधकही आहेत. यातील विरोधकांमध्ये दोन स्पष्ट प्रवाह दिसून येतात. एका बाजूला, काँग्रेस पक्षाची भूमिका विसंगत राहिली आहे; पक्षानं राष्ट्रीय पातळीवर घेतलेली भूमिका केरळ राज्य काँग्रेस कमिटीनं मात्र स्वीकारलेली नाही. दुसऱ्या बाजूला, भारतीय जनता पक्षासारख्या हिंदुत्ववादी पक्षांनी आपल्या सत्तेला मिळणाऱ्या पाठबळाशी सुसंगत अशी भूमिका घेऊन खोलवर रुजलेल्या धार्मिक रचनांना उचलून धरलं आहे.

या प्रकरणातील लिंगभावात्मक न्यायाला ज्यावरून विरोध होतो आहे, ते मुद्दे नैतिकदृष्ट्या चुकीचे आहेतच, शिवाय राज्यघटनेसाठीही हानिकारक आहेत. भाजप अध्यक्षांच्या अलीकडच्या एका विधानातूनही हे स्पष्ट झालं. अंमलात आणता येणार नाहीत, असे निकाल सर्वोच्च न्यायालयानं देऊ नयेत, असं भाजप अध्यक्षांनी म्हटल्याच्या बातम्या आल्या होत्या. यातून तीन प्रश्न उपस्थित होतात. एक, भाजपाध्यक्ष ही शंका का उपस्थित करत आहेत? दोन, लिंगभावात्मक न्यायाचं उद्दिष्ट साध्य करण्याबाबत केरळमधील काँग्रेससारख्या राजकीय पक्षांची कटिबद्धता नक्की कोणत्या स्वरूपाची आहे? तीन, सर्वोच्च न्यायालयानं साबरीमालासंबंधी दिलेल्या निकालाच्या बाजूनं उभं राहात लोकशाही संपन्न करण्याची क्षमता कोणत्या सामाजिक व राजकीय शक्तींकडे आहे?

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाबाबत भाजप अध्यक्षांनी दिलेली प्रतिक्रिया छुप्या संशयखोरीची आहे. निकालानंतर भाजपाध्यक्षांनी 'लोकक्षोभा'ची भीती दोन निरनिराळ्या उद्देशांनी वापरलेली दिसते. एक, या निकालाचा विरोध करणाऱ्या केरळमधील विशिष्ट समाजघटकांना संघटित करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. केरळमध्ये सत्ता काबीज करण्याचं स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्यासाठी भाजपाध्यक्ष उतावीळ झाले आहेत, त्यामुळं अशा प्रकारे लोकभावना चेतवण्याचं काम त्यांनी सुरू केलं आहे. अशामुळं या निकालाचं परिवर्तनकारी सामर्थ्य व आदर्शलक्ष्यी महत्त्व कमी लेखलं जातं. दोन, समाजानं– विशेषतः समतावादी भर असलेल्या समाजानं– कसं असावं, याविषयीचा प्रश्न टाळण्यासाठी भाजपाध्यक्षांनी सदर निरीक्षण नोंदवलं, हे त्याहून गंभीर आहे. खरं तर, अशा पारलौकिक प्रश्नांमध्ये भाजप किंवा संघ परिवारातील इतर सदस्य रस घेताना दिसतच नाहीत. भाजपाध्यक्ष आणि त्यांची मातृसंस्था भविष्यापेक्षा 'भूतकाळा'मध्ये जास्त रस घेतात, हे या अभावामागचं कारण असू शकतं. या 'संभाव्य प्रश्ना'सोबत येणारी नैतिकता स्वीकारायची, तर भाजपला सर्व मानवांना समतेनं वागवावं लागेल, एवढंच नव्हे तर समतेच्या प्रतिपादनासाठीची स्थळंही पुरवावी लागतील. इतर धर्मांच्या पवित्र स्थानांप्रमाणे साबरीमाला मंदिर हे असंच एक समतेचं प्रतिपादन करता येणारं स्थळ आहे. या संदर्भात, आधुनिक भारतातील एक उत्कृष्ट विचारक जोतिबा फुले यांची मांडणी आजही प्रस्तुत ठरते. 'निर्मिक' (देवापेक्षा भिन्न असलेली संकल्पना) समतेच्या बाजूचा आहे आणि त्याला इच्छित सद्गुण मानावं,

असं जोतिबांचं म्हणणं होतं. त्यांच्या दृष्टीनं स्त्री व पुरुष दोघांसाठीही समता ही सर्वांत महत्त्वाची होती. 'निर्मिका'च्या समतावादी दृष्टीची पूर्तता करण्याची सामाजिक व नैतिक जबाबदारी या स्त्री-पुरुषांवरच असल्याचं ते मानत.

सर्वसाधारणतः समता व न्याय यांचा प्रश्न कोणत्याही कायदेशीर हस्तक्षेपाहून स्वतंत्र व त्यापूर्वीचा असल्याचं मानायला हवं. निराळ्या शब्दांत सांगायचं तर, हटवादी जनतेला लिंगभावात्मक समतेच्या दिशेनं नेण्यासाठी पुढाकार घेण्याची जबाबदारी नागरी समाजाच्या सदस्यांवर आणि त्याहून महत्त्वाचं म्हणजे औपचारिक राजकीय अवकाशात कार्यरत असलेल्या राजकीय पक्षांवर असते. सभ्य होण्याची इच्छा असणाऱ्या कोणत्याही समाजानं समता व न्याय यांच्या प्राप्तीसाठी आवश्यक पार्श्वभूमी निर्माण करण्याचे प्रामाणिक व संवेदनशील प्रयत्न करणं गरजेचं असतं. लिंगभावात्मक समता व न्याय हे सामायिक हिताचे मुद्दे आहेत आणि लिंग, वंश व जात यांच्या अलाहिदा सर्वांना याचा लाभ व्हायला हवा, हे राजकीय पक्षांनी समजून घ्यायला हवं. पुरुष कित्येक युगांपासून मंदिरांमध्ये प्रवेश करत असताना हा अधिकार स्त्रियांना नाकारणाऱ्या दृढमूल पितृसत्तेविरोधात लोकमत निर्माण करण्याची गरज संबंधित पक्षांनी विवेकानं मान्य करायला हवी. त्यामुळं स्त्रियांच्या मंदिरप्रवेशाचा मुद्दा नैतिक व मूल्यनिष्ठ संदर्भांमध्ये समाजासाठी प्राथमिक आस्थेचा ठरायला हवा. साधक-बाधक विचारविनिमयासाठी कायदेशीर व्यवस्थेकडे जाण्यापूर्वी हा मुद्दा सामाजिक पातळीवर हाताळायला हवा.

लिंगभावात्मक न्यायाला प्रतिकार करणारं लोकमत निर्माण करण्याचा प्रयत्न भाजपाध्यक्षांनी केला, यातून मंदिरप्रवेशाच्या मुद्द्यात गुंतलेल्या पितृसत्तेला प्रोत्साहन मिळेल. प्रतिगामी समाज निर्माण करण्याचा प्रकल्प अखेरीस खोल रुजलेल्या पितृसत्तेला मदत करत मंदिर आस्थापनेवरील स्वतःचं नियंत्रण दृढ करेल; या प्रक्रियेत लिंगभावात्मक न्याय टाळण्याची वृत्ती वाढेल. स्त्रिया व कनिष्ठ जातीयांच्या समतावादी इच्छांवर निर्बंध लादण्याची या व्यवस्थेची सत्ताही यातून दिसते. राजकीय पक्ष व लोक दोघेही राज्यघटनेचा आदर करत नसतील, तर लिंगभावात्मक न्यायासारख्या सार्वत्रिक मूल्यांच्या रक्षणासाठी सर्वोच्च न्यायालयाला हस्तक्षेप करावा लागतो. पक्षांच्या अपुरेपणामुळं स्त्रियांच्या बाजूनं पुढाकार घेणं सर्वोच्च न्यायालयाला अत्यावश्यक ठरतं. लिंगभावात्मक न्यायाच्या मुद्द्यावर सामाजिक एकमत निर्माण करण्यात राजकीय पक्ष अकार्यक्षम ठरले आहेत, हे साबरीमाला प्रकरणातून दिसलं. परंतु, केरळमधील डाव्या लोकशाही आघाडी सरकारनं या निकालाच्या अंमलबजावणीमध्ये दाखवलेला निर्धार दखलपात्र आहे. त्याचप्रमाणे डाव्या लोकशाही आघाडीनं आणि इतर कनिष्ठ जातीय संघटनांनी लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी चालवलेले प्रयत्न सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाशी सुसंगत असून लोकशाही आशय वृद्धिंगत करणारे आहेत. परिवर्तनकारी न्यायिक कृतिशीलतेचा आणखी एक दाखला म्हणून साबरीमाला प्रकरणातील निकालाकडे पाहता येईल. राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वं आणि प्रस्तुत तरतुदींच्या आधारेच सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांनी हा निकाल दिला, हे नमूद करण्याची गरजही नाही. घटनात्मक नैतिकतेविषयीची कटिबद्धता आणि लोकशाहीचे आदर्श यासंबंधी केरळ काँग्रेस समितीच्या कामगिरीचं मूल्यमापन करण्यासाठीची आदर्शलक्ष्यी प्रमाणकं या निकालाद्वारे उपलब्ध झाली. सर्वोच्च न्यायालयानं पुरस्कारलेल्या व्यक्तिगत अधिकारांचा त्यांनी आदर करायला हवा, त्याचसोबत समतेचा अधिकार हा स्वयंसिद्ध गुण आहे हेही समजून घ्यायला हवं.

●

**अनु. : प्रतिनिधी**

इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीचे विविध संपादकीय लेख अनुवादित करण्यासाठी 'एच. टी. पारेख फाउंडेशन'चे साहाय्य लाभले आहे. (३ नोव्हेंबर २०१८ या अंकातून)